दि. ०८.०९.२०२२

# प्रेस नोट
# चांदणी चौक फ्लायओव्हर प्रकल्प
# वाहतूक नियोजन

सध्या चांदणी चौक फ्लायओव्हर व सेवा रस्त्याचे काम NHAI कडून प्रगतीत आहे. ७० टक्के काम पूर्ण झाले असून जून २०२३ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्रकल्पाचा एक भाग म्हणजेच अस्तित्वातील अरुंद पूल (VOP) पाडून त्या ठिकाणी ११५ मी. लांब व ३६ मी. रुंद नविन पुलाचे बांधकाम करणे. दि. १२ सप्टेंबर २०२२ ते १५ सप्टेंबर २०२२ दरम्यान अस्तित्वातील पूल पाडण्याचे नियोजन झाले आहे.

सदरील पुलावरुन सध्या मुळशी ते पाषाण / बावधन — कोथरुड अशी एकेरी वाहतूक सुरु होती. पूल पाडल्यानंतर लगेचच नविन पुलाचे बांधकाम सुरु होईल व सेवा रस्त्यांचे पुलामुळे अडलेले काम पण सुरु होईल व नजिकच्या काही दिवसातच वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात सुटेल.

पुल तोडल्यानंतर खालील प्रमाणे वाहतुकीचे नियोजन केलेले आहे.

१. **एन.डी.ए./मुळशी ते बावधन पाषाण — वारजे** — एन.डी.ए. व मुळशी कडून पाषाण बावधन कोथरुड वारजे कडे जाणारी वाहतूक नव्याने तयार केलेल्या उड्डाणपुलावरुन (रॅम्प क्र. १) वरुन सोडण्यात येईल.

२. **एन.डी.ए./मुळशी — मुंबई** — एन.डी.ए./मुळशी कडून मुंबई कडे जाणारी वाहतूक रॅम्प क्र. ३ मार्गे रॅम्प क्र. ७ वरुन सोडण्यात येईल.

**इतर रॅम्प व हायवे वरील वाहतूक पूर्वीप्रमाणेच राहील.**

३. **मुंबई ते बावधन/पाषाण — कोथरुड** — मुंबई ते बावधन/पाषाण ही वाहतूक पाषाण कनेक्टर वरुन सोडण्यात येईल. मुंबई ते कोथरुड ही वाहतूक अस्तित्वातील कोथरुड रॅम्प वरुन खाली सोडण्यात येईल.

४. **मुंबई ते मुळशी** — ही वाहतूक कोथरुड अंडरपास एन.डी.ए चौक मार्गे मुळशी कडे सोडण्यात येइल.

५. **बावधन / पाषाण ते मुंबई** – सदरील वाहतूक कोथरुड पाषाण कनेक्टर – कोथरुड अंडरपास मार्गे वेदविहार एन.डी.ए रस्त्याकडून मुंबई हायवेवर जोडण्यात येईल.

६. **बावधन/पाषाण ते सातारा – वारजे –** सदरील वाहतूक पाषाण कनेक्टर नंतर हायवे वरुन सातारा व वारजे कडे सोडण्यात येईल.

६. **कोथरुड ते मुंबई** – सदरील वाहतूक कोथरुड अंडरपास ते वेदविहार एन.डी.ए. रस्त्यावरुन ते हायवेवर जोडण्यात येईल.

७. **कोथरुड ते एन.डी.ए./मुळशी** – ही वाहतूक कोथरुड अंडरपास नंतर एन.डी.ए. रॅम्प वरुन एन.डी.ए. कडे व पुढे मुळशी कडे सोडण्यात येईल.

८ **कोथरुड ते सातारा/वारजे** – ही वाहतूक सातारा हायवे सेवा रस्त्यावरील श्रंगेरीमठा जवळून हायवे वरुन सातारा व वारजे कडे वळविण्यात येईल.

९. **सातारा ते एन.डी.ए./मुळशी** – सदर वाहतूक वेदभवन सेवा रस्त्यावरुन एन.डी.ए. चौकातून एन.डी.ए. कडे व पुढे मुळशी कडे सोडण्यात येईल.

१०. **सातारा ते बावधन/पाषाण** – सदरील वाहतूक रॅम्प ७ ते मुळशी रोड व त्या पुढे नव्याने तयार केलेल्या उड्डाणपुलावरुन (रॅम्प क्र. १) बावधन पाषाण कडे सोडण्यात येईल.

११. **सातारा ते कोथरुड** – ही वाहतूक वेदविहार सेवा रस्त्यावरुन अस्तित्वातील कोथरुड अंडरपास मार्गे सोडण्यात येईल.

**वरील प्रकारे वाहतूक नियोजन केले असून सर्व आवश्यक त्या ठिकाणी सूचनाफलक (Sign Boards) मराठी व इंग्रजीतून लावलेले आहेत.**

**प्रकल्प संचालक**
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
पकाई, पुणे